ISSN: 2229-48
Abhisara
VOL XV SPECIAL ISSUE APRIL 20

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS



PART IV

*Editors*

Dr. Vasant Sanap
Mr. Shailesh Akulwar

19.

# मराठी निवडक साहित्यातील गांधीवाद

प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे

महात्मा गांधीच्या तत्त्वज्ञानातील प्रमुख त्रिसुत्री म्हणजे "सत्य, अहिंसा व प्रेम " होय. गांधीच्या मतानुसार सत्यच जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे. प्रेम हाच गांधीचा धर्म होता. संपूर्ण जगाला पथदर्शक असणारे तत्व म्हणजे प्रेम होय. म. गांधी व्यवहारी तत्वज्ञ होते. आजच्या शाळा केवळ पुस्तकी ज्ञान देणारी केंद्रे असून, त्या उद्याच्या हस्तव्यवसायाच्या केंद्रशाळा झाल्या पाहिजेत. असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे.

माणसामाणसातील संबंध हे विश्वासाचे व्हावेत. ते भीतीवर आधारित नसावेत. माणूस हा निसर्गतः चांगला प्राणी आहे. मानवी अंतःकरणातील चांगुलपणावर त्यांचा विश्वास होता. मनुष्य केवळ सुशिक्षित असून चालत नाही तर तो सुसंस्कृत असला पाहिजे. चारित्र्याची निर्मिती करू शकते, तेच सर्वोच्च शिक्षण होय. मानवतेची सेवा हेच गांधीच्या तत्त्वज्ञानाचे सार आहे. मानवतेवर आणि प्राण्यांवरही त्यांचे खूप प्रेम होते. मानवता हेच सत्य होय. म. गांधीच्या मते माणसाचे मोठेपण त्याने माणसासाठी केलेल्या उपकारक कार्यावरच अवलंबून असते. सत्य, अहिंसा, प्रेम व सेवा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनाला जर वळण, नवी दिशा द्यावयाची असेल, त्यात परिवर्तन घडवावयाचे असेल तर शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. भारताच्या जनतेला स्वाभिमानाने जगायला शिकविणारे , त्यांना माणूस बनविणारे, त्यांच्या पोटाला उद्योग देणारे, त्यांना चारित्र्य संपन्न बनवून स्वराज्याला लायक करणारे शिक्षण गांधीना अपेक्षित होते. त्यांच्या जीवनाविषयक तत्त्वज्ञानाचे त्यात सार दडलेले दिसते.

एकविसावे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचे एक युग आहे. जागतिकीकरणामुळे एक विश्व संस्कृतीला चालना मिळत आहे. प्रत्येक [illegible] भांडवल गुंतवणूक करून उद्योगधंदे सुरू करण्याची सूट मिळत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रवास एक विश्व संस्कृतीचा एक "वैश्विक गाव" ही कल्पना आकाराला येत आहे. प्रत्येक असाक्षरता नष्ट होईल. राष्ट्र व राज्याला सीमा राहाणार नाहीत. अशी जागतिकीकरणाची संकल्पना आहे. पण भारताच्या बाबतीत बोलायचे झाले तर माणूसच माणसाचा द्वेष करत आहे. गरीब अधिकच गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे. शहरी भारत व ग्रामीण भारतामध्ये अधिक ताण निर्माण होत आहे. एकमेकांचा द्वेष करीत आहे. आजही महात्मा गांधीचा अहिंसा, प्रेम, बंधुभाव संयम, त्याग, सत्य, शांतीचा संदेश सर्वांना

उपयुक्त आहे. महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचे पडसाद निवडक मराठी साहित्यात कसे उमटले आहेत त्याचा शोध घेणे गरजेचे आहे.

"खेडयाकडे चला" हा संदेश मध्यमवर्गीय लोकांना पहिल्यांदा म. गांधींनीच दिला. त्यातुच अनेक मध्यम्वर्गीय माणसे खेडयाकडे येवू लागली. अस्पृश्यता निवारण, शिक्षणप्रसार, खेडयांचा उध्दार करू लागली. त्याचे प्रतिबिंबही साहित्यामध्यून उमटू लागले. गांधीवादाचा बराच मोठा वैचारिक प्रभाव वा. म. जोशी यांच्यावर पडला होता. सामाजिकतेचा स्वीकार करणारे ते कादंबरीकार होते. समाजशास्त्रज्ञ केतकरांच्या म्हणून त्यांनी उघड समर्थन केले होते. राजकीय चळवळीतील सहभागही उल्लेखनीय आहे. "इंदू काळे व सरला भोळे" या कादंबरीत गांधीवादी विचारांची परीक्षा ते घेताना दिसतात. वामन जोशी स्वतः गांधी विचार जगत होते. आणि त्यांविषयी ते लेखनही करताना दिसतात. उपरोक्त कादंबरीतील विनायकरावांचे व्यक्तिचित्र अभ्यास करण्यासारखे आहे. महाराष्ट्रातल्या युवकांनी गांधीवादाचा पुरस्कार वैचारिक समाधानामुळे आणि तात्विक आस्थेने केला असे नव्हे. स्वातंत्र्य चळवळींच्या उत्साहात इतर जोरदार मार्गांच्या अभावी तो त्यांना करावा लागला असे "इंदू काळे व सरला भोळे" ही कादंबरी सांगते. गांधींच्या तत्वज्ञानावर मराठी कादंबरीची फार निष्ठा आढळत नाही. गांधीवादापेक्षाही गांधींच्या व्यक्तिमत्वाचे आकर्षण अधिक दिसून येते. वरेरकरांच्या कादंबरीतील गांधीवाद पाहण्यासारखा आहे.जपेल तेवढा पचेल तेवढा गांधीवाद या नायकांनी स्वीकारलेला दिसतो "फाटकी वाकळ" मधला नायक म्हणतो की, "मी खेडयात आलो खरा पण अजूनही वास्तवाचा खरा बोध मला झालेला नाही. अजून पुष्कळ गोष्टी करायच्या होत्या. आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या जीवनाकडे एकदा नजर फिरवून त्यांना कोणत्या कामाला लावता येईल हे ठरवायचे होते. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये गांधीजींचा खादीप्रचार, हातमागावर सूत तयार करण्याचे प्रशिक्षण, [illegible] आलेले आहेत. कट्टर गांधीवादी नायक येथे उभा राहताना दिसत नाही. मूलभूत दृष्टीचा अभाव येथे दिसतो, वि.स.खांडेकर या लेखकावर गांधीवादाचा अधिक प्रभाव दिसून येतो. वा.ल. कुलकर्णी खांडेकरांबद्दल लिहितात.

"खांडेकरच्या कांचन मृगापासून ययातीपर्यंत कथा साहित्यावरचा प्रभाव- कुणाही आंधळयालाही दिसून येईल." खांडेकर हे जीनवादी लेखक आहेत. त्यागमय जीवनाचा स्वीकार करणारे आहेत. मानवतेचे ते पूजारी आहेत. त्यांच्या लेखणीला गांधीवादी रंग येताना दिसतो. वि.स. खांडेकर हे "कांचनमृगा" पासून ते "दोन ध्रुव" पर्यंत गांधीवादाने भारावलेले दिसतात. नायकाचे खेडयात जाणे, तिथे जावून शिक्षण प्रसार करणे, कुण्या निल [illegible] खेडयाचा विकास करण्यासाठी शाळेला

संपत्ती दान करणे इत्यादी गोष्टी "कांचनमृग" मध्ये आल्या आहेत. "दोन ध्रुव" मधील नायिका मजुरांच्या जीवनाशी एकरूप होते व पश्चात्तापदग्ध पतीलाही वाटेला लावते. दोन वर्गातले अंतर दोन ध्रुवा इतके आहे. याची जाणीव प्रकर्षाने होते. याच कादंबरीत उन्मत्त रेडयाला मारू नये असे अहिंसावादी बाप्पा म्हणतात. पण शेवटी त्याला मारावे लागते. अहिंसेचे आत्यंतिकतेचे किंवा अव्यवहार्यतेचे हे प्रकटीकरण होय.

ग्रामीण साहित्यातही गांधीवादी विचारांचे पडसाद उमटलेले आहेत. गांधीवादी विचारांचा स्वीकार अनेक लेखकांनी केला आहे. प्रतिनिधीक स्वरूपात र.वा. दिघे यांच्या "पाणकळा" या कादंबरीचा आपण विचार करणार आहेत. १९३६ मध्ये दिघ्यांनी ग्रामवादी विचाराने प्रेरीत होऊन "पाणकळा " ही कादंबरी लिहिली. "पाणकळा" या कादंबरीतील आनंदराव पात्र आहे. त्याचा परिचय करून देताना लेखक म्हणतो. " गरिबांचा कैवार लहानपणापासूनच आनंदरावांच्या मनात घुसला होता. शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याचो त्यांची तिव्र इच्छा होती...... आधुनिक शास्त्रीय ज्ञान आत्मसात करून शेतीच्या जीवनात आपण समरस झालो तर आपल्यासारखा सुखी माणूस जगात कोणी व्हावयाचा नाही. असे त्याचे मत होते. " खेडयातील जीवन माणसाला जगण्यासाठी पोषक असते. शेतीत मनाला शांतता मिळते. आल्हाद मिळतो. मनाला विसावा मिळतो. जमिनीचा एक तुकडा एका कुटुंबाच्या सर्व गरजा भागवतो. मग शहराच्या घाणीत राहून जिवाची धडपड करण्याचे कारण काय ? खेडेगावातच आपल्या जीवनाचे आपण नंदनवन करू शकतो. खेडयातील निसर्गाच्या सान्निध्यात मानवाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. निसर्गशक्तीला तोंड देतच जगण्याचा आनंद आहे. त्यातच खरे माणूसपण दडलेले आहे. असे कादंबरीकाराचे निवेदन आहे. निसर्गाचे मनोगत सांगताना र. वा. दिघे लिहतात.

"माझे सौंदर्य [illegible] असेल, माझी मजा तुम्हाला चाखायची असेल तर तुम्ही माझ्याशी युध्द केले पाहिजे. मला जिंकून माझ्या शक्तींचा उपयोग करून घ्या. माझ्या पाण्याचे प्रवाह अडवून उन्हाळ्यात, दुष्काळात, त्यावर सोन्याचे पीक काढा...... माझ्या पासून वीज तयार करून रानावनात वीजेचा लखलखाट करा." अशाप्रकारे निसर्गाचे मनोगत येथे व्यक्त झाले आहे. खेडे हा निसर्गाचा भाग आहे. निसर्गाच्या सानिध्यात राहून निसर्गाचा आपल्या हितासाठी उपयोग केला पाहिजे. हा विचार येथे व्यक्त झाला आहे. लेखकाला या कादंबरीत गांधीजींच्या स्वप्नातील खेडे उभे करायचे आहे. गांधीजींना प्राचीन काळातील स्वयंपूर्ण खेडे घडवायचे होते. त्यासाठी त्यांनी ग्रामोद्योग, कुटिरोद्योग, या प्रदुषणमुक्त उद्योग व्यवसायांचा पुरस्कार केला. ब्रिटीश अंमलात शेतकऱ्यांची दुर्दशा झाली. त्यांची दुर्दशा थांबवून ग्रामवादी

विचारांच्या सहाय्याने गांधीजींना भारत देश सुखी बनवायचा होता. तेच त्यांचे स्वप्न होते. गांधीजींचे हे स्वप्न र.वा. दिघे यांनी आपल्या कादंबरीतून आविष्कृत केले आहे. अशा प्रकारे या कादंबरीचा नायक आनंदराव गांधी प्रणीत ग्रामोध्दाराचा मार्ग घेऊन अवतरला आहे. तो निष्ठेने ग्रामोध्दाराचे कार्य करतो. एक खेडे सुधारून उपयोगाचे नाही तर भारतातील सर्व खेडे सक्तीने सुधारली पाहिजेत. पाणकळा ही कादंबरी वगळता र.वा. दिघेंच्या दुसऱ्या कोणत्याही कादंबरीत ग्रामवादाचा पुरस्कार आढळत नाही.

र.वा. दिघ्यांनी कार्तिकी ही कादंबरी अस्पृष्यतेचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवून लिहीली आहे. अस्पृष्यता निवारण हेही महात्मा गांधींच्या सामाजिकतेचे हे एक अंग होते. " कार्तिकी" या कादंबरीत दिघे अस्पृष्यतेचा प्रश्न हाताळून सामाजिक कार्याची बूज राखतात. असे दिसत असले तरी त्यांचा मूळ उद्देश बोधवादी आहे. मनोरंजक कादंबरी लिहिण्याचा आहे. अस्पृष्यतेच्या सामाजिक प्रश्नाविषयी लेखकाच्या मनात अकृत्रिम जीव्हाळा आहे. हे खरे असले तरी या कादंबरीचे स्वरूप रंजन प्रधानच आहे. अशा प्रकारे महात्मा गांधींच्या विचाराने प्रभावित होऊन अनेकांनी मराठी कादंबऱ्या लिहिल्या. आजही गांधींचा विचार उपयुक्त आहे. हे मान्य करावे लागते.

संदर्भ ग्रंथ


१. अंकुर रवींद्र, कादंबरीकार र.वा. दिघे, मेहता पब्लिशिंग हाऊस सदाशिव पेठ पुणे - ३०
२. दिघे र. वा. पाणकळा कादंबरी, श्री लेखन वाचन भांडार पुणे आवृत्ती पाचवी १९७५
३. डॉ. बांदिवडेकर चंद्रकांत, मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा मेहता पब्लिशिंग हाऊस सदाशिव पेठ पुणे - ३६ प्रथम आवृत्ती १९७३
४. दिघे र.वा. महाराष्ट्र साहित्य पत्रिका जुलै डिसेंबर १९८०
५. बांदिवडेकर चंद्रकांत मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्र. आ. १९८१


❑❑❑